(1)

# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ

सिडको भवन (दक्षिण कक्ष) १ ला मजला, बेलापूर, नवी मुंबई, ४०० ६१४.

क्र.मपापुजनिमं/1094/63/आ-4.

1994/10/11.

प्रति,

1. मा.श्री. अरुण गुजराथी,
अध्यक्ष,
म.पा.पु.व ज.नि.मंडळ,
(मा.मंत्री, नगर विकास), मंत्रालय
मुंबई 400 032.

2. मा.श्री. रणजित देशमुख,
(मा.मंत्री, ग्राम विकास), मंत्रालय,
मुंबई 400 032.
(विशेष निमंत्रीत)

3. मा.श्री. शिवाजीराव पंडित,
उपाध्यक्ष,
म.पा.पु.व ज.नि.मंडळ,
(मा.राज्यमंत्री, ग्राम विकास)
मंत्रालय, मुंबई 400 032.

4. मा.श्री.जयदत्त क्षिरसागर,
राज्यमंत्री, नगर विकास, मंत्रालय,
मुंबई 400 032.
(विशेष निमंत्रित)

5. श्री.य.ल.राजवाडे,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032.

6. श्री.डी.टी.जोसेफ,
सचिव, नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032.

7. श्री. सुरेश कुमार,
सचिव, ग्राम विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032.

8. श्री. श्री.ब.गांगुर्डे,
उपसचिव (खर्च) वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032.

9. श्री.प्रभाकर मणचेकर,
आयुक्त, ठाणे महानगरपालिका,
ठाणे

10. श्री.जगन्नाथ शिवलिंग पाटील,
सदस्य,
जिल्हा परिषद, सोलापूर, जि. सोलापूर.

11. श्री. गणेश रॉय,
सदस्य,
अध्यक्ष, चांदूररेल्वे नगरपरिषद,
चांदूररेल्वे, जिल्हा अमरावती.

12. श्री.एम.आर.अगरवाल,
सदस्य,
ऄ-1/5 अगरसेन सोसायटी,
कोरेगांव पार्क, पुणे.

13. श्री.एम.के. गोखले,
सदस्य,
नृसिंह धाम, विष्णूनगर, नौपाडा, ठाणे.

14. श्री.राजेंद्र सगणे,
सदस्य सचिव,
म.पा.पु.व ज.नि.मंडळ,
मुंबई 400 021.

विषय : दिनांक 30.8.1994 रोजी झालेल्या मंडळाच्या 63 व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक 12.8.1994 व 30.8.1994 रोजी झालेल्या मंडळाच्या 63 व्या सभेचे इतिवृत्त सोबत पाठविण्यांत येत आहे.

वरील इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास ते या कार्यालयास कृपया त्वरीत पाठवावे म्हणजे ते मंडळाच्या पुढील सभेत विचारासाठी ठेवण्यात येईल

आपला विश्वासू,

(ज.बा. आंबेगावकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी.

सोबत : इतिवृत्त पृ.क्र.1 ते १७

प्रत इतिवृत्त सविनय व अवलोकनार्थ सादर
श्री.एस.डी.अरमाळ, मुख्य अभियंता (प्रकल्प)
श्री.ए.ए.संकपाळ, मुख्य अभियंता (ग्रामीण)
श्री.ज.बा. आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
श्री.एम.आर.कुळकर्णी, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.
श्री.आर.एस.सांखोळकर, सहसचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.
श्री.मा.प.पटवर्धन, उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रत, इतिवृत्त माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
मुख्य अभियंता (नागरी/ग्रामीण/प्रकल्प) म.पा.पु.व ज.नि.मंडळ, मुंबई.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.पा.पु.व ज.नि.मंडळ, नवी मुंबई.
अधीक्षक अभियंता, मुख्यालय/सी.पी.डी.एम./जागतिक बँक/गुण नियंत्रण कक्ष.
उप मुख्य लेखा अधिकारी 1/2/3
आस्थापना अधिकारी (द) / प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी.

3

विषय :-दिनांक 12.8.94 (शुक्रवार) व दि.30.8.94 (मंगळवार) रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त....

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 63 वी सभा शुक्रवार दि.12.8.94 रोजी मंत्रालयात 5 वा मजला, समिती कक्ष येथे दुपारी 2.30 वाजता आयोजित केली होती. सुमारे दोन तास कामकाज झाल्यानंतर उर्वरीत वेळे अभावी ही सभा तहकूब करावी लागली त्यामुळे राहिलेल्या कार्यक्रम बाबीवर सभा पुन्हा दि.30.8.94 (मंगळवार) रोजी मा.मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष यांचे दालनांत दुपारी 4.00 वाजता घेण्यात आली. अध्यक्षस्थानी मा.मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.अरूणलाल गुजराथी होते.

वरील सर्व दिवशी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे खालील सदस्य त्यांचे समोर दर्शविलेल्या तारखेस उपस्थित होते.

| | | दिनांक |
|---|---|---|
| 1. मा.श्री.अरूणलाल गुजराथी<br>मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष. | अध्यक्ष | 12, 30.8.94 |
| 2. मा.श्री.माणिकराव ठाकरे<br>राज्यमंत्री,ग्राम विकास व मंडळाचे उपाध्यक्ष. | उपाध्यक्ष | 30.8.94 |
| 3. मा.श्री.रणजित देशमुख<br>मंत्री, ग्राम विकास | विशेष निमंत्रित | 12,30.8.94 |
| 4. मा.श्री.अशोकराव चव्हाण<br>राज्यमंत्री, नगर विकास. | विशेष निमंत्रित | 12,30.8.94 |
| 5. श्री.व्यंकट चारी<br>प्रधान सचिव, नगर विकास. | सदस्य | 12,30.8.94 |
| 6. श्री.डी.टी.जोसेफ<br>सचिव-1,नगर विकास. | सदस्य | 12,30.8.94 |
| 7. श्री.सुरेश कुमार<br>सचिव, ग्राम विकास. | सदस्य | 12,30.8.94 |
| 8. श्री.जगन्नाथ शिवलींग पाटील<br>सदस्य,जिल्हा परिषद,सोलापूर. | सदस्य | 12,30.8.94 |
| 9. श्री.गणेश रॉय<br>अध्यक्ष, चांदूररेल्वे नगरपरिषद. | सदस्य | 12,30.8.94 |
| 10. श्री.एम.आर.अगरवाल | सदस्य | 12,30.8.94 |
| 11. श्री.एम.के.गोखले | सदस्य | 12,30.8.94 |
| 12. श्री.श्रीधर गांगुर्डे<br>उप सचिव(खर्च) वित्त विभाग. | सदस्य | 12.8.94 |
| 13. श्री.रा.मा.सगणे | सदस्य सचिव | 12,30.8.94 |

मंडळाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजूरी देण्यात आली.

महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळाचे खालील अधिकारी विशेष निमिंत्रीत म्हणून उपस्थित होते.

1. श्री.एस.डी.अरमाळ, मुख्य अभियंता (प्रकल्प)
2. श्री.के.आर.मठकर, मुख्य अभियंता (नागरी)
3. श्री.ए.ए.संकपाळ, मुख्य अभियंता (ग्रामीण)
4. श्री.ज.बा.आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.

मंडळाचे अध्यक्ष व मंत्री, नगर विकास यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. मा.मंत्री (ग्राम विकास) यांची सह अध्यक्ष म्हणून व मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांची सह उपाध्यक्ष म्हणून नेमणूक करण्याबाबत तांतडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दोन्हीही सभेत अध्यक्षांनी दिल्या. नंतर विषयवार चर्चेला सुरवात करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.1** :महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 62 व्या सभेच्या प्रारूप इतिवृत्तास मान्यता देणे..

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या बुधवार दि.30.3.94 रोजी झालेल्या 62 व्या सभेचे इतिवृत्त मंडळाच्या सर्व सदस्यांना पाठविण्यात आले होते. त्यात कोणत्याही सदस्यांनी सुचना अथवा दुरूस्ती सुचविली नाही असे मंडळाच्या सदस्य सचिवांनी निदर्शनास आणले. तेंव्हा कोणताही आक्षेप न घेता सदर इतिवृत्तास दुजोरा देण्यात आला व मंजूर करण्यात आले. मंडळाची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी असे सदस्यांनी सुचविले.

**कार्यक्रम बाब क्र.2** :

महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 62 व्या सभेतील बाबीवर करण्यात आलेली कृती...

सदस्य सचिवांनी 62 व्या सभेतील बाबीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सदस्यांना माहिती दिली. खालील बाबीवर सविस्तर चर्चा झाली.

**कार्यक्रम बाब क्र.5/6** : सन 1991.92 चे वार्षिक अहवाल व वार्षिक लेखे (परिक्षणासह) दोन्हीही सभागृहांत सादर करण्यात आले आहे. त्यांची प्रत सदस्यांना देण्यात आली. तसेच सन 1992.93 च्या अभिलेखाची सद्यस्थिती सांगण्यात आली. हे अहवाल सादर करण्यास होणारा विलंब टाळता येईल का, याबाबत चर्चा झाली. परंतू लेखे पुर्ण करण्यासाठी व त्यांच्या तपासणीसाठी लागणारा कालावधी हा ठरवून दिलेला आहे. आणि तेवढा कालावधी लागणारच त्यामुळे लेखे अहवाल सादर करण्यांस लागणारा कालावधी आवश्यक असल्याचे मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी सांगितले. त्याचप्रमाणे मंडळाच्या 62 व्या सभेत सुचविल्याप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या सद्यस्थितीचा अहवालही मंडळाच्या सर्व सदस्यांना सादर करण्यांत आला. **असा आढावा दर तिमाहिस घेण्यात यावा असे सदस्य श्री.अगरवाल यांनी सुचविले व त्यास मान्यता देण्यात आली.**

**बाब क्र.11** : नगरपालिकांकडून शासनातर्फे थकबाकी वसूल करणेबाबत प्रधान सचिव,नगर विकास विभाग (श्री.चारी) यांनी असे सांगितले की, त्यांनी राज्यातील नाशिक,औरंगाबाद,नागपूर व अमरावती या महसूल

विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य प्रशासकीय अधिकारी, जिल्हा परिषद, मुख्याधिकारी, नगरपालिका यांच्या बैठका घेऊन मंडळाची आर्थीक स्थिती संबंधितासमोर मांडली असून शासन स्तरावर सतत पाठपुरावा चालू आहे व संबंधितांनी थकबाकीच्या 50% सहामाही भरणा मंडळाकडे करण्यांत येईल असे आश्वासन दिले आहे. ही रक्कम मंडळास मिळाल्यावर मंडळाला त्याचा बराच उपयोग होईल. शासन आपल्या स्तरावर योग्य तो पाठपुरावा करीत आहे व करीत राहील. मात्र मंडळाचे अधिकारी व महसूल खात्याचे अधिकारी यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे. **याबाबत सतत पाठपुरावा करण्यासाठी मंडळाने प्रत्येक मंडळात एका अधिका-यास ही जबाबदारी द्यावी असे मंत्री (ग्राम विकास) यांनी सुचविले.**

**कार्यक्रम बाब क्र.3** : अहमदनगर मलनिःसारण योजनेच्या 10.5 द.ल.लि.प्रतिदिनी क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्राच्या कामाबाबत मे.हॅड्रोलिक्स ॲन्ड जनरल इंजिनिअर्स कंपनीस वाढीव एस्केलेशन देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अशा प्रकारचे वाढीव एस्केलेशन देण्यात आले तर पूर्वी झालेल्या इतर कामांबाबतही अशाच प्रकारची मागणी येण्याची शक्यता असल्याचे मा.मंत्री, नगर विकास/ग्राम विकास यांनी निदर्शनास आणून दिले. त्या अनुषंगाने या ठरावास मंजूरी देण्यापूर्वी अशा प्रकारचे वाढीव एस्केलेशन यापूर्वी कोणा ठेकेदारास देण्यात आले आहे काय तसेच अशा प्रकारची इतर काही जुन्या कामांची प्रकरणे यापुढे उद्‌भवू शकतील काय याबाबतची माहिती मंडळास सादर करावी असे ठरले. तसेच या झालेल्या विलंबास कोण जबाबदार आहे याची चौकशी करण्याची सूचना मंत्री (ग्राम विकास) यांनी केली.

ही बाब मंजूर केल्यास वर उल्लेख केल्याप्रमाणे इतर प्रकरणे उद्‌भवण्याची शक्यता असल्याने या ठरावास सध्याच मान्यता न देण्याचे ठरले. या कामास झालेला विलंब समर्थन करणारी सविस्तर कारणे पुन्हा तपासून पुढील बैठकीत विषद करावीत असेही ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.4** : जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र पाणीपुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्प टप्पा-2 मधील पॅकेज 3 च्या निविदा स्विकृती बाबतच्या ठरावावर सविस्तर चर्चा झाली. यामध्ये सर्वात कमी निविदा आणि त्या खालोखालची दुसरी निविदा या दोन्ही निविदातील किंमतीमध्ये बरीच तफावत असल्याचे मंडळाच्या सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. याबाबत खुलासा करताना मंडळाच्या सदस्य सचिवांनी असे सुचित केले की, जागतिक बँकेच्या आदेशानुसार प्रत्येक ठेकेदाराला जास्तीत जास्त एकूण किती कामे देता येतील ते आधीच ठरविण्यात आले असून त्याप्रमाणेच कामांची वाटणी करणे आवश्यक ठरते. त्यामुळे काही निविदांचे बाबतीत सर्वात कमी निविदा भरलेल्या ठेकेदाराला काम देणे शक्य होत नाही व त्यामुळेच दुस-या किंवा त्यावरील क्रमांकाच्या ठेकेदाराला निविदा देणे भाग पडते. जागतिक बँकेच्या धोरणानुसार संबंधित ठेकेदाराशी निविदांच्या किंमतीबाबत कोणत्याही प्रकारची वाटाघाटी (निगोसियशन) करण्यास परवानगी नाही, त्यामुळे सर्वात कमी असलेली निविदा आणि दुसरी किंवा पुढील निविदा यामध्ये जास्त रक्कमेचा फरक असला तरीसुध्दा वर उल्लेख केल्याप्रमाणे दुस-या किंवा पुढील क्रमांकावरील ठेकेदारास त्यांनी दिलेल्या दरानुसार निविदा देणे भाग पडते.

वरील बाबी लक्षात घेता मंडळाने सदर निविदा शासनाकडे पाठविण्याबाबत केलेली कार्यवाही मंजूर करण्यात आली. सुधारित निविदेबाबत जागतिक बँक आणि महाराष्ट्र शासन यांचेकडून अंतिम मान्यता मिळाल्यानंतर निविदा स्विकृतीची त्याबाबतची पुढील कार्यवाही मंडळाचे सदस्य सचिवांनी करावी असे ठरले.

चर्चेनंतर खालील ठराव मान्य करण्यात आला.

**ठराव :-** 1) महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्पांतर्गत गट 3 मधील निविदा 17 ते 20 व 22 ते 27 च्या स्विकारार्थ तसेच योजनेच्या अंदाजित किंमतीच्या खर्चापेक्षा होणा-या जास्त खर्चास मान्यता मिळविण्यासाठी शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

2) शासन व जागतिक बँकेची वरील निविदांच्या खर्चास अंतिम मान्यता मिळाल्यावर प्रस्तुत निविदा स्विकारण्यास मंडळाची मान्यता आहे. या संदर्भात पुढील आवश्यक कार्यपूर्तीसाठी मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधीकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.5 :** नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी 1994.95 या वर्षात करण्यात आलेली तरतूद कमी असल्यामुळे व मंडळाकडे राज्यातील नगरपालिकांकडून मोठया प्रमाणावर थकबाकी येणे असल्यामुळे तसेच नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी आयुर्विमा महामंडळ आणि हुडकोकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी नगरपालिकांकडून निधी मंडळाकडे जमा केला जात नसल्यामुळे मंडळास योजनांचे कामासाठी मिळणा-या निधीमधून मोठया प्रमाणावर निधी यासाठी वळवावा लागतो, त्यामुळे त्याचा परिणाम मंडळाच्या चालू असलेल्या कामांवर झालेला असल्याचे मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. 1994.95 या वर्षात सुमारे 62 कोटी रूपये वरील कारणासाठी मंडळास उपलब्ध झालेल्या निधीमधून वळवावे लागणार असल्याचे सदस्य सचिवांनी मंडळाच्या सदस्यांना विदीत केले.

मंडळाच्या थकबाकीच्या वसुलीच्या संदर्भात शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत असली तरीही प्रत्येक नगरपालिकाकडून थकबाकीची वसूली झाली नाही तर वरील प्रमाणे मोठया प्रमाणावर निधी वळविणे मंडळास भाग पडणार आहे. या बाबीचा विचार करून नगरपालिका/महानगरपालिका यांना आपल्या कर्जाचे हप्ते पुर्णतः व वेळेवर भरावे यासाठी **शासन स्तरावर कडक कार्यवाही करण्याची विनंती** मंडळातर्फे करण्यांत यावी आणि तरीही हप्त्यांची रक्कम संबंधित नगरपालिकाकडून प्राप्त न झाल्यास **अशी रक्कम शासनाकडून मंडळास खास निधी म्हणून देण्याची विनंती शासनास करावी असे सुचविण्यात आले.** सदस्य सचिवांनी मंडळास भेडसावणा-या आर्थीक समस्यांची सर्व सदस्यांना जाणीव करून दिली व त्याची नोंद घेण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.6/7/8 :**

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या प्रकल्प क्षेत्रातील/क्षेत्राबाहेरील/न्हावा शेवा पाणी पुरवठा केंद्रातून 1994.95 या वर्षाकरिता होणा-या पाणी पुरवठयासाठी सुधारित दर आकारण्याबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली, आणि प्रस्तावित केलेल्या वाढीव दरास मंडळाने मान्यता दिली. चर्चेमध्ये भाग घेताना सचिव (नगर विकास) यांनी सुचविले की, **पाटबंधारे खात्याप्रमाणेच मंडळाच्या आस्थापना खर्चाची अंदाजपत्रकातच तरतूद केली पाहिजे.** राज्यमंत्री ( नगर

विकास) यांनी सुचविले की, पाण्यासाठी येणा-या खर्चाच्या आधारावरच त्याचे दर ठरविले पाहिजेत. **सचिव, नगर विकास यांनी असेही सुचविले की, ग्राहकाकडे थकबाकी असेल तर नोटीस देऊन एम.एस.ई.बी. प्रमाणेच त्याच्या पाण्याचे कनेक्शन बंद केले पाहिजे.**

दिनांक 12.8.94 रोजी झालेल्या बैठकीत ई.टी.पी.चार्जेसच्या अनुषंगाने झालेल्या चर्चे-नुसार सुधारित कार्यक्रम बाब 7 व 8 वर दि.30.8.94 रोजी परत चर्चा झाली व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठयाचा दर व न्हावा शेवा केंद्रातून होणारा पाणी पुरवठा दर या प्रस्तावाचा फेरविचार करण्यात आला व प्रस्तावांत अल्पसा बदल करून मंडळाने खालील ठराव संमत केले.

ठराव : (6)

मंडळ असा ठराव करीत आहे की, **"प्रकल्पक्षेत्रातील"** खालील संयोजन धारकासाठी पाणीपुरवठा दराची वाढ दि.1.10.94 किंवा उच्च न्यायालयाची परवानगी मिळाल्यानंतर मा.सदस्य सचिव ठरवतील त्या तारखेपासून लागू करण्यात यावी.

| अ.क्र. ग्राहकांचा तपशील | दर 1000 लि.(रूपये) विद्यमान | प्रस्तावित |
|---|---|---|
| 1. ठोक पुरवठा | | |
| 1. घरगुती | 2.15 | 2.75 |
| 2. टेमघर पाणीपुरवठा योजनेंतर्गत असलेले ग्रामीण क्षेत्र. | 1.50 | 2.00 |
| 3. बिगर घरगुती | 9.60 | 12.00 |
| 2. किरकोळ पुरवठा. | | |
| 1. घरगुती | 2.30 | 3.00 |
| 2. बिगर घरगुती | 10.80 | 13.50 |
| 3. शाळा, महाविद्यालये,शासकीय निमशासकीय कार्यालये, शासकीय दवाखाने,धर्मदाय संस्था व इतर ना नफा तत्वावर चालणा-या संस्था. | 5.00 | 6.25 |
| 4. खास ग्राहके (आयुधे निर्मिती कारखाना) | 4.50 | 5.70 |

5. मापन यंत्र असलेल्या नळ जोडासाठी किमान आकार.

मापन यंत्राव्दारा पाणीपुरवठयाचे किमान दर हे झालेल्या मासिक वापरास अनुसरून खालील प्रमाणे आहेत. (दर रूपयांत)

| संयोजन नलिकेचा व्यास. | किरकोळ घरगुती पुरवठा दर प्रति मास प्रती संयोजन. | | ना नफा तत्वावर चालणा-या संस्था(प्रारूप ठरावातील अ.क्र.3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रति मास प्रति संयोजन. | | किरकोळ बिगर घरगुती पुरवठा दर प्रतिमास प्रति संयोजन. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित |
| 15 मि.मि. | 43 | 54 | 100 | 125 | 194 | 243 |
| 20 मि.मि. | 79 | 99 | 185 | 231 | 360 | 450 |
| 25 मि.मि. | 115 | 144 | 269 | 336 | 518 | 648 |
| 30 मि.मि. | 173 | 216 | 403 | 504 | 778 | 973 |
| 40 मि.मि. | 302 | 378 | 706 | 883 | 1360 | 1700 |
| 50 मि.मि. | 382 | 478 | 890 | 1113 | 1720 | 2150 |
| 65 मि.मि. | 468 | 585 | 1092 | 1365 | 2110 | 2638 |

6 अ. मापन यंत्र नसलेल्या नळ जाडासाठी किमान आकार.
ज्या संयोजनांना मापनयंत्र जोडले नाहीत अशा संयोजनासाठी पुरवठा नलिकेच्या व्यासावर आधारित दर.

| संयोजक नलिकेचा व्यास | सरसकट दर प्रति संयोजन प्रतिमास घरगुती किरकोळ पुरवठयाकरिता | | ना नफा तत्वावर चालणा-या संस्थाकरिता सरसकट दर (प्रारुप ठरावातील अ.क्र.3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे) | | सरसकट दर प्रति संयोजन प्रतिमास किरकोळ बिगर घरगुती पुरवठयासाठी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित |
| 15 मि.मि. | 58 | 73 | 115 | 144 | 259 | 324 |
| 20 मि.मि. | 100 | 125 | 202 | 253 | 460 | 575 |
| 25 मि.मि. | 200 | 262 | 418 | 523 | 936 | 1170 |

ब. ज्या ग्राहकांची मापनयंत्रे 3 महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी नादुरुस्त असतील अशा ग्राहकांना 3 महिन्याच्या सरासरी वापरानुसार आकारणी करण्यात येईल. किंवा विना मापन यंत्र संयोजन आकारणी प्रमाणे (वरील प्रमाणे) जो जास्त आकार असेल तो लावण्यात येईल.

25 मि.मि.वरील संयोजनाचा पुरवठा फक्त जलमापन यंत्राप्रमाणे असेल. विभागीय अधिका-यांनी 25 मि.मि.पेक्षा जास्त संयोजनाना विना जलमापन यंत्र पुरवठा करु नये.

7. ठोक पुरवठयासाठी किमान आकार.

घाऊक पुरवठयासाठी करार बरहुकूम किमान मासिक आकारणी केली जाईल. तथापि सदर किमान आकारणी 2 द.ल.लि.पाणी पुरवठयापेक्षा जास्त आणार नाही.

8. सार्वजनिक नळ आकार.

अ) प्रत्येक जलमापन यंत्र विरहित सार्वजनिक नळ जोडासाठी रु.360/- द.मा.

ब) जर नळ जोड जलयंत्रासहित असेल तर नळजोड बसविण्याची व त्याच्या देखभालीची जबाबदारी मालकाची राहील. जर जल यंत्र 3 महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी नादुरुस्त असेल तर मागील 3 महिन्याच्या सरासरी वापरावर किंवा जल यंत्र विरहित सार्वजनिक नळ आकारणी यामधील जो जास्त भर असेल त्या प्रमाणे आकारणी केली जाईल.

9. विलंब आकारणी:

जो ग्राहक देयक तयार केलेल्या दिनांकापासुन 30 दिवसाच्या आत पाणीपटटी आकारणी (थकबाकीसहीत) देणार नाहीत ते देयक तयार केलेल्या दिनांकापासुन 30 दिवसानंतर सर्व थकीत रक्कमेवर 1.5 % दरमहा दराने विलंब आकारास पात्र ठरतील. जे ग्राहक सतत सहा महिने देयक (विलंब आकारासह) भरण्याचे टाळतील त्याचा पाणी पुरवठा खंडित होईल.

10. प्रकल्प क्षेत्रातील न्यायालयाने मान्यता दिलेल्या तारखेपासून सुधारित दरासाठी आवश्यक ती परवानगी मिळविण्यासाठी सदस्य सचिवांना उच्च न्यायालयास जाण्याचा अधिकार राहील.

ठराव : 7:

मंडळ असा ठराव करीत आहे की, मंडळाच्या प्रकल्प क्षेत्राबाहेरील ग्राहकांसाठी करावयाच्या पाणी पुरवठयाचा दर दिनांक 1.10.1994 किंवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासुन खालील प्रमाणे असतील.

| अ.क्र. | ग्राहकाचा तपशिल | दर पैशात प्रति 1000 लि. | |
|---|---|---|---|
| | | विद्यमान | प्रस्तावित |
| 1. | 2. | 3. | 4.. |
| 1.अ) | धावूक घरगुती पाणी पुरवठा. | | |
| | 1. महाराष्ट्र विद्युत मंडळाची देयके परस्पर भरणा-या नगरपालिकांना केलेला धाऊक पाणी पुरवठा. | 240 | 100 |
| | 2. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे विद्युत देयके न भरणा-या इतर नगरपरिषदांना केलेला पाणी पुरवठा. | 240 | 290 |
| | 3. मंडळाच्या मुख्य वितरणातून प्रतीमाह 2 द.ल. लि. पेक्षा जास्त पाणी घेणारे घरगुती ग्राहक | 240 | 290 |
| | (ब) बिगर घरगुती पाणी पुरवठा | 1200 | 1440 |
| 2. | किरकोळ पाणी पुरवठा. | | |
| | अ) घरगुती | 250 | 300 |
| | ब) बिगर घरगुती. | | |
| | 1. "क" वर्ग नगरपालिकाखेरीज होणारा पाणी पुरवठा | 1200 | 1440 |
| | 2. "क" वर्ग नगरपालिकेतील प्रतिमाह 2 द.ल. लि. पर्यंत पाणी घेणा-या ग्राहकांसाठी केलेला पुरवठा | 600 | 720 |
| | ( "क" वर्ग नगरपालिकेतील प्रतिमाह 2 द.ल.लि. पेक्षा जास्त पाणी घेणा-या ग्राहकांना वरील 1-ब प्रमाणे दर आकारण्यात येईल.) | | |
| 3. | शाळा, महाविद्यालये, शासकीय निमशासकीय कार्यालये धर्मादाय संस्था, सरकारी रुग्णालये आणि ना नफा तत्वावर चालणा-या संस्था. | 500 | 600 |
| 4. | विशेष ग्राहक | | |
| | 1. औरंगाबाद पेपर मिल्स, पैठण | 385 | 465 |
| | लष्करी कारखान्याना करावयाचा शुध्द पाणीपुरवठा | | |
| | अ) अंबाझरी | 500 | 600 |
| | ब) ओझार | 500 | 600 |
| | क) अणुशक्ती केंद्र, तारापूर | 500 | 600 |
| 5. | गिरीस्थाने | | |

10

| 1. | 2. | 3. | 4. |
|---|---|---|---|
| 1. | घरगुती | 260 | 315 |
| 2. | बिगर घरगुती | 1500 | 1800 |

6. मापन यंत्र असलेल्या नळ जोडासाठी किमान आहार.

एखादया महिन्यात पाण्याचा वापर विहित किमान प्रमाणापेक्षा कमी असेल तर खालील प्रमाणे किमान दर आकारला जाईल.

(दर रुपयात)

| नळ जोडाचा आकार | थेट घरगुती वापरासाठी दर प्रती नळ जोडास प्रतिमास | | ना नफा तत्वावर चालणा-या संस्था ज्या वरील ठरावातील अ.क्र.3 मध्ये दर्शविलेल्या आहेत. त्या संस्थांना प्रति नळास प्रतिमास | | बिगर घरगुती वापरासाठी दर प्रति नळ जोडास प्रतिमास | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित |
| 15 मि.मि. | 24 | 29 | 51 | 61 | 120 | 144 |
| 20 मि.मि. | 48 | 58 | 102 | 122 | 240 | 288 |
| 25 मि.मि. | 96 | 115 | 203 | 244 | 480 | 576 |
| 32 मि.मि. | 144 | 173 | 304 | 365 | 720 | 864 |
| 40 मि.मि. | 196 | 235 | 405 | 486 | 960 | 1152 |
| 50 मि.मि. | 240 | 288 | 506 | 607 | 1200 | 1440 |
| 65 मि.मि. | 312 | 374 | 659 | 791 | 1560 | 1872 |

7. मापनयंत्र नसलेल्या नळ जोडासाठी किमान आकार.

अ) ज्या नळ जोडास मापन यंत्र बसविले नसेल अशा ठिकाणी नळ जोडाच्या आकारावरुन खालीलप्रमाणे किमान आकार आकारला जाईल.

(दर रुपयात)

| नळ जोडाचा आकार | घरगुती वापरासाठी सरसकट दर प्रती नळ जोडास प्रतिमास | | ना नफा तत्वावर चालणा-या संस्था ज्या वरील ठरावातील अ.क्र.3 मध्ये दर्शविलेल्या आहेत. अशा संस्थासाठी प्रती नळ जोडास प्रतीमास | | बिगर घरगुती वापरासाठी सरसकट दर प्रति नळ जोडास प्रतिमास | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित | विद्यमान | प्रस्तावित |
| 15 मि.मि. | 56 | 67 | 112 | 134 | 285 | 342 |
| 20 मि.मि. | 112 | 134 | 224 | 269 | 629 | 755 |
| 25 मि.मि. | 224 | 269 | 448 | 538 | 1139 | 1367 |

ब) बसविलेल्या मापनयंत्र 3 महिन्यापेक्षा अधिक काळापासून चालू नसेल अशा नळ जोड त्यांनी 3 महिन्यात वापरलेल्या पाण्याची सरासरी किंवा मापनयंत्र नसलेल्या नळ जोडासाठी असलेले व किमान दर यातील जी जास्त रक्कम असेल ती रक्कम आकारण्यात येईल.

25 मि.मि.पेक्षा जास्त आकाराचे नळ जोड मापनयंत्र असलेल्या नळ जोडासाठी दे येतील. विभागीय अधिका-यांनी 25 मि.मि. पेक्षा जास्त आकाराच्या नळ जोडासाठी माप बसविल्याशिवाय पाणी पुरवठा करू नये.

8. ठोक पाणी पुरवठयासाठी किमान आकार.

ठोक पाणी पुरवठयासाठी किमान आकार करार पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे रहात तसेच हा किमान दर 2 द.ल.लि.पाणी पुरवठयाच्या आकारापेक्षा कमी असणार नाही.

9. मापनयंत्र नसलेल्या सार्वजनिक नळ जोडासाठी आकार.

अ. मापन यंत्र नसलेल्या प्रत्येक सार्वजनिक नळजोडास प्रतिमास रु.348/-

ब. सार्वजनिक नळजोडास मापन यंत्र बसवावयाचे असेल तर ते बसविले आणि त्य देखभाल करणे ही ग्राहकांची जबाबदारी राहील. जर अशी मापनयंत्रे महिन्यापेक्षा जास्त काळ चालू नसतील तर तीन महिन्यात वापरलेल्या पाण सरासरी किंवा मापनयंत्र नसलेल्या सार्वजनिक नळजोडासाठी असलेला दर यातील जी र जास्त असेल ती रक्कम आकारण्यात येईल.

10. विलंबित प्रदान विषयक आकार.

प्रत्येक ग्राहकास देयकाच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत देयकाचा मागील थकबाक भरणा न केल्यास दरमहा 1.5 % दराने विलंब प्रदान आकार, देयक मिळालेल्या तारखेपासून दिवसांनंतरच्या कालावधीसाठी द्यावा लागेल. जे ग्राहक सलग सहा महिन्याच्या देयकाचा विलंब आकार भरणा करणार नाहीत त्याचा पाणी पुरवठा बंद करण्यात येईल.

(12)

ठराव :8:

मंडळ असा ठराव करीत आहे की, न्हावा शेवा पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठयाचे दर दिनांक 1.10.94 पासून किंवा मा.सदस्य सचिव यांनी ठरविलेल्या तारखेपासून लागू करण्यात येतील.

| पाणी पुरवठयाचा प्रवर्ग | पाण्याचा प्रति 1000 लि.च्या दर |
|---|---|
| 1. न्हावा शेवा पाणी पुरवठा केंद्रातून सिडकोस होणारा पाणी पुरवठा. | रु. 5.10 |
| 2. ज.ने.पो.ट्रस्ट व इतर घाऊक ग्राहकांना होणारा पाणी पुरवठा. | रु. 10.00 |
| 3. पनवेल नगरपरिषदेस होणारा पाणी पुरवठा. | रु. 5.65 |

(2) विलंब आकार :

जे ग्राहक पाणी पुरवठयाचे देयक थकित बाकीसहित देयकाच्या दिनांकापासुन 30 दिवसांच्या आत भरत नाही त्यास प्रतिमहा 1.5 % दराने सर्व देय रकमेवर विलंब आकार द्यावा लागेल. तसेच जो ग्राहक सातत्याने 3 महिने थकित रक्कम भरत नाही त्याचा पाणी पुरवठा खंडीत करण्यात येईल.

(3) घाऊक पाणी पुरवठयाचा सरसकट दर

घाऊक पाणी पुरवठयाचा सरसकट दर हा ग्राहक व मंडळ यांच्यात झालेल्या करारामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

**कार्यक्रम बाब क्र.9 :** आस्थापना, हत्यारे व सौनयंत्रण आकार वाढविण्याबाबत :

वरील बाबीमध्ये मंडळाच्या ई.टी.पी. चार्जेसमध्ये 17.1/2 टक्के वरुन 21 टक्के पर्यंत वाढ करण्याबाबत सुचविण्यात आले आहे. याबाबत मंत्री, ग्राम विकास यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, अशी वाढ सरसकटपणे नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना लागू करण्यात आली तर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांवर अवास्तव जास्त बोजा पडण्याची शक्यता आहे. तेंव्हा या दृष्टीने नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांबाबत वेगवेगळया दराने ई.टी.पी. चार्जेस लावण्यात यावे.

याबाबत अधिक खुलासा करताना श्री. जोसेफ, सचिव, नगर विकास यांनी असे निदर्शनास आणून दिले की, शासनाच्या पाटबंधारे विभागाकडे ई.टी.पी. वरील खर्चासाठी स्वतंत्रपणे नियतव्यय मंजूर करण्यांत येत असतो. मंडळाने आस्थापनेवर असणा-या कर्मचा-यांचा पगार आणि त्या अनुषंगाने होणारा इतर **खर्च हा न टळता येण्यासारखा असल्याने** त्या खर्चाचा संबंध मंडळातर्फे कार्यान्वित होत असलेल्या नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे कामांच्या खर्चाशी न जोडता पाटबंधारे विभागात ज्याप्रमाणे आस्थापना खर्चासाठी स्वतंत्र नियतव्यय मंजूर करण्यात येतो त्याप्रमाणे मंडळासाठीही अशा प्रकारचा नियतव्यय स्वतंत्रपणे मंजूर करण्याबाबतची विनंती शासनास करण्यात यावी असे त्यांनी सुचविले.

मंडळास उपलब्ध होणा-या निधी मधून आयुर्विमा महामंडळाच्या तसेच हुडकोचे कर्ज फेडण्यासाठी मंडळास बराज जास्त निधी वळवणे भाग पडत असल्यामुळे कामावर खर्च करण्यासाठी उपलब्ध होणारा निधी त्याप्रमाणात कमी होतो, पर्यायाने त्या प्रत्यक्ष खर्चावर सध्याचे 17.1/2 टक्के दराने ई.टी.पी. चार्जेस काढण्यात आल्यास ई.टी.पी. द्वारे उपलब्ध होणारा निधी आणि आस्थापनावरील प्रत्यक्ष खर्च यामध्ये मोठी तफावत आढळून येते आणि त्यामुळेच सदर आकार 17.1/2 टक्के वरुन 21 टक्के पर्यंतचा प्रस्ताव मंडळाने केला होता. तथापि वर उल्लेख केल्याप्रमाणे शासनाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर जर वेगळा नियतव्यय उपलब्ध होऊ शकला तर अशा प्रकारे ई.टी.पी. चार्जेस वाढविण्याची गरज भासणार नाही, म्हणून मंडळाने हा ठराव ना मंजूर केला. ई.टी.पी. चार्जेस न वाढविल्यामुळे मंडळाला तोटा होणार असेल तर तसे वार्षीक लेख्यांमध्ये दिसुन येईल व तसे दाखविण्यास काही हरकत नाही असे मा. अध्यक्ष व नगरविकास मंत्री यांनी सांगितले.

**कार्यक्रम बाब क्र.10 :** मंडळातर्फे मोरबे धरणाचे उर्वरित काम आणि म.पा.पु.व ज.नि. न्हावा-शेवा प्रकल्प टप्पा-3 मधील कामे सिडको मार्फत मंडळाने करावयाचे ठरल्यास सदर कामांचे बाबत ई.टी.पी. चार्जेस हे सवलतीच्या दराने लावण्याबद्दलच्या ठरावावर मंडळाच्या 62व्या सभेत चर्चा झाली होती आणि त्यावेळी ठरल्याप्रमाणे जादा माहिती 63व्या सभेत सादर करण्यात आली. याबाबत सदस्य सचिवांनी असा खुलासा केला की, ज्यावेळी मोठया किंमतीची एकाच ठिकाणी असलेली कामे केली जातात त्यावेळी कामावर प्रत्यक्षात होणारा आस्थापना, हत्यारे व सौनयंत्रणावरील खर्च कमी होतो, त्यामुळे सुमारे 225 कोटी रु. खर्चाच्या न्हावा-शेवा प्रकल्प टप्पा-3 चे काम आणि मोरबे धरणाचे उर्वरित काम 14 टक्के ई.टी.पी. चार्जेस लावून सिडकोच्या पुर्ण ठेव तत्वावर करण्याबाबतच्या ठरावास मान्यता देण्यात यावी. चर्चेनंतर खालील ठराव मान्य करण्यात आला.

ठराव : **मंडळ असा ठराव करते की, मोरबे धरणाचे उर्वरित काम आणि म.पा.पु.व ज. न्हावा-शेवा प्रकल्प टप्पा-3 या सिडकोतर्फे घेण्यात येणा-या मोठया पाणी पुरवठा प्रकल्पाचे कामासाठी म.पा.पु.व ज. नि. मंडळाने पूर्ण ठेव तत्वावर 14 टक्के एवढेच ई.टी.पी. चार्जेस लावून पूर्ण ठेव तत्वावर ते काम स्विकारावयास मंडळ शासनास खालील अटीवर शिफारस करीत आहे :-**

**"सिडकोकडून येणा-या पैशाची कधीही कमतरता भासून कामात व्यत्यय येणार नाही याची खात्री होण्याचे दृष्टीने सिडकोकडून या कामासाठी निधी अग्रिम हा नियत वेळेवर व योग्य त्या प्रमाणात मिळावा".**

**कार्यक्रम बाब क्र. 11/12/13 :**

कमी खर्चाची स्वच्छता योजना तसेच नेहरू रोजगार योजना अंतर्गत हुडकोकडून कर्ज उभारण्याच्या तिनही प्रस्तावास मंडळाने मान्यता दिली व खालील ठराव मंजूर करण्यात आले.

**ठराव - 11 :**

कमी खर्चाची स्वच्छता योजना - बांधकाम रु. 46.14 लाख हुडको कर्ज स्विकारण्यास कर्जाच्या अटी / शर्तीसह मंडळ संमती देत आहे. आणि सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना कर्जासाठी हुडकोकडे संपर्क साधण्याबाबत अधिकार देण्यात येत आहेत.

**ठराव - 12 :**

शिरपूर नगरपालिकेसाठी नेहरू रोजगार योजना घरबांधणी व गृहसुधार कार्यक्रमांतर्गत रु. 47, 25,000/- हुडको कर्ज कर्जाच्या अटी / शर्तीसह स्विकारण्यास मंडळ संमती देत आहे. आणि सदस्य सचिव / वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना कर्जासाठी हुडकोकडे व शासन हमीसाठी शासनाकडे संपर्क साधण्याबाबत अधिकार देण्यात येत आहेत.

**ठराव - 13 :**

चोपडा नगरपालिकेसाठी नेहरू रोजगार योजना घरबांधणी व गृहसुधार कार्यक्रमांतर्गत रु. 47,25,000/- हुडको कर्ज कर्जाच्या अटी / शर्तीसह स्विकारण्यास मंडळ संमती देत आहे. आणि सदस्य सचिव / वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना कर्जासाठी हुडकोकडे व शासन हमीसाठी शासनाकडे संपर्क साधण्याबाबत अधिकार देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र. 14 :**

पैठण औद्योगिक क्षेत्रातील पाणी पुरवठा मंडळाची जलवाहिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडे हस्तांतर करण्याबाबत चर्चा झाली. पैठण योजना क्षेत्रातील औरंगाबाद पेपर मिल, नाथ पेपर मिल व एकनाथ सहकारी कारखाना तसेच औद्योगिक विकास महामंडळ यांच्या स्वतःच्या पाणी पुरवठा योजना आता कार्यान्वित झाल्यामुळे सध्याची मंडळाचीही चालू असलेली पाणी पुरवठयाची व्यवस्था तशीच पडून राहील. सध्याच्या योजनेअंतर्गत टाकलेली पाईपलाईन, आहे त्यास्थितीत, औद्योगिक विकास मंडळाकडे वर्ग केली तर केलेली कामे वाया न जाता त्यांचा वापर चालू राहील व या प्रस्तावामुळे मंडळाला त्याची किंमतहि परत मिळेल. मंडळाच्या अटी औद्योगिक विकास मंडळ मान्य करण्यास तयार असल्याने सदरहू पाईपलाईन हस्तांतरीत करण्यास हरकत नाही. त्यामुळे मंडळाचा खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव :**

मंडळाने 1976 साली पैठण औद्योगिक क्षेत्रास पाणी पुरवठा करण्यासाठी योजना कार्यान्वियीत योजनेचे ग्राहक औरंगाबाद पेपर मिल व एकनाथ साखर कारखाना यांनी त्यांच्या स्वतःच्या पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केल्या. तसेच नाथ पेपर मिल व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची स्वतंत्र पाणी पुरवठा योजना आहे. अशा परीस्थितीत सद्याची, मंडळाने केलेली, योजना वापरात येणार नाही व ती पडून राहील या योजनेतील पाईप लाईन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ताब्यात घेण्यास तयार असल्याने वर नमुद केल्याप्रमाणे रु. 65 लाख किंमत घेवून व वरील अटीच्या अधीन राहून या योजनेतील पाईप लाईन महाराष्ट्र औद्योगिक विकास महा मंडळास वर्ग करण्यात यावी.

**कार्यक्रम बाब क्र. 15 :**

श्री. गणपती तुकाराम तिप्पे यांची जमिन सार्वजनिक पाण्याची विहिर बांधण्याकरिता संपादन केली. त्यामुळे त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून त्या जागेची भरपाई म्हणून, खास बाब म्हणून, मंडळाच्या सेवेत सामावून घेण्याच्या प्रस्तावावर मा. मंत्री, ग्राम विकास यांनी, अशा प्रकारची अनेक प्रकरणे सादर होण्याची शक्यता दर्शीवली. नियमात अशी तरतूद भविष्यात नाही व सार्वजनिक पाण्याची विहिर बांधण्यासाठी संपादन केलेल्या जमिनीसाठी नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे श्री. तिप्पे यांना भरपाई द्यावी असे ठरले त्यामुळे प्रस्तावित ठराव अमान्य केला.

**कार्यक्रम बाब क्र. 16 :**

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळातील वसूली कक्ष 1993-94 च्या पुढे चालू ठेवण्यास मंजूरी मिळण्याबाबतच्या कार्यक्रम बाबी बाबत चर्चा झाली. महानगरपालिकेकडे किंवा ग्राम पंचायतीकडील वसूली अद्याप झालेली नाही. त्यामुळे वसूलीकक्षाचा कालावधी वाढविणे आवश्यक आहे. या वसुलीकक्षात

1. तहसिलदार - 2 पदे.
2. वरीष्ठ लिपिक - 1 पदे.
3. लिपिक टंकलेखक - 1 पद.

अशी पदे आहेत.

तहसिलदार या पदी महसूल विभागातून कोणी अधिकारी मंडळात येण्यास इच्छुक नसल्याने तहसिलदार या वर्ग-2 च्या पदाऐवजी सहाय्यक लेखा अधिकारी या संवर्गातील वर्ग-2 च्याच अधिका-यांच्या नियुक्तीने भरण्यास परवानगी देण्यात यावी म्हणून वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी प्रस्ताव मांडला. या वसूली कक्षास नगरपालिका, ग्राम पंचायती वगैरेकडून वसूली करण्यासाठी वार्षिक टार्गेट ठरवून द्यावे. अशा सूचना मा. ग्राम विकास मंत्री, श्री. रणजित देशमुख यांनी दिल्या व खालील ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव :** वसूली कक्षातील पदांना 28.2.96 पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मंडळ या ठरावाद्वारे मान्यता देत आहे. शासनाकडून वसूली कक्षातील पदांना 28.2.96 पर्यंत पुढे चालू ठेवण्यासाठी मान्यता मिळविण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही बाबतचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यात मंडळ संमती देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. 17 :**

बाणकोट प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना ता. मंडणगड, जि. रत्नागिरी या कामाचे ठेकेदारांच्या मे. पटेल कन्स्ट्रक्शन कंपनी धरणाच्या कामाच्या कंत्राटतील एस्केलेशन मागणीबाबत सदस्य सचिवांनी सांगितले की, कार्यक्रम बाब 3 प्रमाणे सर्व माहिती काढून ही कार्यक्रम बाब परत मंडळापुढे ठेवण्यात येईल. त्यामुळे ठराव अनिर्णयीत राहीला.

**कार्यक्रम बाब 18 :**

जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प टप्पा-1 पॅकेज 1 मधील स्विकृत निविदांतील ए.सी. पाईप्स् व सि.आय.डी. जॉईन्टचे एक्सलेशनसंबंधीची पध्दती ऐवजी नविन प्रस्तावीत पध्दत पॅकेज 2 प्रमाणे अवलंबिले या कार्यक्रम बाबीवर चर्चा झाली. एक्सलेशन संबंधीची तरतूद मा. मंत्री, श्री. रणजित देशमुख, ग्रामीण मा. श्री. अशोक चव्हाण, राज्यमंत्री, नगर विकास, यांनी श्री. राजेंद्र सगणे, सदस्य सचिव व श्री. एस.के. पाटील, अधीक्षक अभियंता यांचेकडून सविस्तर समजावून घेतली. सविस्तर चर्चेनंतर खालील ठरावास मान्यता देण्यात आली.

**ठराव : जागतिक बँक प्रकल्पाच्या ग्रामीण पाणी पुरवठा टप्पा-1, पॅकेज-1 च्या निविदामधील ॲसबेस्टॉस सिमेंट प्रेशर पाईपसच्या भाववाढीची रक्कम काढण्याकरिता स्वीकृत निविदामध्ये जी पध्दत दिली आहे, त्याऐवजी पॅकेज-2 च्या निविदामधील दिलेल्या पध्दतीनुसार या साहित्याच्या व सी.आय.डी. जॉईन्टच्या भाववाढीची रक्कम काढवयास, जागतिक बँकेच्या व संबंधित कंत्राटदाराच्या मान्यतेच्या अधीन राहून मंडळ मान्यता देत आहे. मात्र अशाप्रकारे काढलेली भाववाढीची रक्कम अदा करताना ती दर वर्षासाठी पाईपच्या किंमतीच्या 7.1/2 टक्के पर्यंत मर्यादित करावी.**

**कार्यक्रम बाब क्र. 19 :**

नागपूर येथे मंडळाचे विश्रामगृह बांधण्याबाबतच्या ठरावास मंडळाने मान्यता दिली व खालील ठराव मंजूर केला.

ठराव : रु. 30.02 लाख अंदाजित खर्चाच्या नागपूर येथे बांधावयाच्या विश्रामगृहाच्या प्रस्तावास महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ या ठरावाने मान्यता देत असून सदर विश्रामगृह, निधीच्या उपलब्धतेनुसार, बांधण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही मंडळाच्या सदस्य सचिव यांनी करावी.

**कार्यक्रम बाब क्र.20 :**

औरंगाबाद येथे प्रशासकीय इमारत व विश्रामगृह बांधणेबाबत चर्चा होऊन मंडळाचे उच्चपदस्थ अधिका-यांना बैठकीसाठी व पाणी पुरवठा योजनांना भेटी देण्यासाठी औरंगाबाद येथे जावे लागते. अशावेळी शासनाची विश्रामगृहे उपलब्ध नसतात तसेच विधी मंडळाचे एक अधिवेशन औरंगाबादला घेण्याविषयी विचार सुरु आहे. त्यामुळे औरंगाबादेस मंडळाचे स्वतंत्र विश्रामगृहाची आवश्यकता आहे हे मंडळाचे सदस्य सचिव यांनी नमूद केले व खालील ठराव संमत झाला.

ठराव : मंडळाचे गारखेडा औरंगाबाद येथील मालकीच्या जागेमध्ये 3,726 मी.$^2$ एकूण बांधकाम क्षेत्र असलेल्या प्रशासकीय इमारतीस व 210 मी.$^2$ क्षेत्रफळ असलेले विश्रामगृह यासाठी अनुक्रमे रु. 153.00 लक्ष ढोबळ व रु. 12.00 लक्ष किंमतीचे बांधकाम करण्यास व निधीच्या उपलब्धतेप्रमाणे काम करुन घेण्यास परवानगी देण्यात येते.

**कार्यक्रम बाब क्र.21 :**

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाकडील विभागीय / उप विभागीय कार्यालयाचे नागरी तथा ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी वर्गीकरण करणेबाबतची सद्यस्थिती विषद करुन यासाठी विभाग, उप विभाग यांच्या स्थलांतराची व त्यातील कर्मचारी शक्यतोवर सामावून कामात अडथळा येणार नाही याची खबरदारी घेण्यात आल्याचे सदस्य सचिवांनी मंडळापुढे माहितीसाठी सादर केले. मंडळ सदस्यांनी याची नोंद घेतली. ग्रामीण व नागरी भागासाठी विभाग व उप विभागांचे स्थलांतरण अतिशय योजनाबध्द रीतीने व सर्वांचे समाधान होईल अशा रीतीने करण्यात आल्याचे नमूद करुन सचिव, ग्राम विकास ह्यांनी विषद केले व मा. अध्यक्ष व सर्व सदस्यांनी याबाबत मंडळाचे अधिकारी कौतुकास पात्र आहेत असे नमूद केले .

**कार्यक्रम बाब क्र.22 :**

**विषय : अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे :**

**वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्यांचा विचार करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले.**

1. ज्या अनधिकृत जोडणी धारकांमार्फत संबंधित नगरपालिकेमार्फत प्रॉपर्टी टॅक्स वसूल केला जातो त्याच नळ जोडण्या अधिकृत करण्याबाबत विचार करावा.

2. एका ठराविक तारखेपर्यंत मुदत घालून त्या तारखेच्या आधी असलेल्या अनधिकृत नळ जोडण्या दंड आकारुन अधिकृत करण्याबाबत विचार करण्यात यावा. परंतू त्यानंतर झालेल्या अनधिकृत नळ जोडण्याधारकांविरुध्द कठोर कार्यवाही करण्यात यावी.

या विषयावर चर्चा करताना असे नमूद करण्यात आले की, अशा प्रकारे अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करण्यात येतात ही बाब ग्राहकांच्या लक्षात आल्यास त्यामुळे ज्या ठिकाणी नळ जोडण्या देणे बंद करण्यात आले आहे अशा शहरात अनधिकृत नळ जोडण्या करुन नंतर त्या अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करण्याचे दृष्टीने अर्ज / विनंत्या करणे सुरु होईल आणि असे घडणे हे योग्य ठरणार नाही.

या संदर्भात अधिक माहिती देताना मुख्य अभियंता, प्रकल्प यांनी असे नमूद केले की, सध्याच्या नियमात अनधिकृत नळ जोडण्या धारकांच्या विरुध्द पोलीस कार्यवाही करण्याची तरतूद आहे, त्यानुसार पोलीस कार्यवाहीसाठी तक्रार अर्ज दिला असता अशा तक्रारीचे बाबत "नॉन कॉग्नेजेबल ऑफेन्स" पोलीस खात्यामार्फत नोंद करण्यात येतात आणि प्रत्यक्षात नळ धारकांचे [illegible]द्ध कोणतीही पोलीस कार्यवाही होत नाही. विशेषतः उल्हासनगर मध्ये मंडळाच्या नि[illegible]नास आलेल्या सुमारे 2000 अनधिकृत नळ जोडण्या विशेष पथकाद्वारे तोडण्याचे काम मंडळाने

मंडळाने केले, परंतू नंतर असे आढळून आले की, या तोडलेल्या अनधिकृत जोडण्या पुन्हा अनधिकृतरित्या संबंधित लोकांनी जोडून घेतल्या. अशा प्रकारच्या नळ जोडण्या तोडण्याची कार्यवाही मंडळ करीत असताना मंडळाच्या क्षेत्रीय कर्मचा-यांना स्थानिक लोकांकडून मोठया प्रमाणावर विरोध होत होता. तसेच वेळ प्रसंगी संरक्षणाचे दृष्टीने पोलीस संरक्षण घेण्याची वेळही आली.

याबाबत अधिक माहिती देताना सदस्य सचिव आणि मुख्य अभियंता - प्रकल्प यांनी असेही नमूद केले की, विशेषतः उल्हासनगर येथे अशा प्रकारे मोठया प्रमाणावर नळ जोडण्या घेण्यात येत आहेत, त्याचे मुख्य कारण म्हणजे उल्हासनगर येथे फार मोठया प्रमाणावर अनधिकृत घरबांधणी चालू आहे. अशा प्रकारे बहुमजली अनधिकृत घरे बांधली गेली की, स्वाभाविकपणे त्यात रहावयास आलेल्या लोकांची अनधिकृत नळ जोडण्या घेण्याची प्रवृत्ती होते आणि त्यामुळे मोठया प्रमाणावर अनधिकृत नळ जोडण्या केल्या जातात. अशा अनधिकृत इमारतींचे संदर्भात उल्हासनगर नगरपालिका मात्र प्रॉपर्टी टॅक्स वसूल करते परंतू अशा इमारतीसाठी घेण्यात आलेल्या अनधिकृत नळ जोडण्यामधून प्रत्यक्षात पाणी पुरवठा होऊन सुध्दा कोणत्याहि प्रकारचे पाण्याच्या बिलांची वसूली मात्र मंडळ करू शकत नाही आणि त्यामुळे खुप मोठया प्रमाणावर पाणीपट्टीच्या वसुलीस मंडळ मुकते, या दृष्टीकोनातून ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आली आहे.

मा. मंत्री, नगर विकास यांनी याबाबत असे आदेश दिले की, मंडळाकडून अशा प्रकारच्या अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करण्याबाबत निर्णय घेतला जाण्याआधी अशा प्रकारच्या अनधिकृत नळ जोडण्याबाबत मुंबई महानगरपालिका / ठाणे महानगरपालिका / कल्याण महानगरपालिका अशा उल्हासनगरच्या परिसरातील मोठया महानगरपालिकांच्या नियमामध्ये काय तरतूद आहे त्याची तपासणी मंडळाच्या अधिका-यांनी करावी व त्याबाबतची माहिती मंडळास सादर करावी. सदर माहितीचा विचार आणि सध्या प्रस्तावित केलेल्या मार्गदर्शक तत्वांची त्या बरोबर तुलना करुन नंतरच मंडळाच्या पुढील बैठकीत यावर निर्णय घेण्यात यावा.

**कार्यक्रम बाब क्र.23 :**

विषय :- ग्रामीण योजनांचा सद्यस्थितीचा अहवाल...

मागील सभेत मा.मंत्री, ग्राम विकास यांनी सुचविल्याप्रमाणे मुख्य अभियंता-ग्रामीण यांनी ग्रामीण योजनांच्या सद्यस्थितीचा जुलै,94 अखेरचा अहवाल मंडळास सादर केला. सदर अहवाल हा विस्तृत स्वरूपात माहिती देणारा असल्याचे मंत्री, ग्राम विकास, राज्यमंत्री, ग्राम विकास तसेच सचिव, ग्राम विकास विभाग यांनी नमूद केले. सदर अहवालातील परिशिष्ट-11 मध्ये अपूर्ण असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे जिल्हावार विश्लेषण देण्यात आले आहे. त्यातील योजना अपूर्ण असण्याची कारणे ही ढोबळ मानाने सर्व योजनांसाठी एकत्रित अशी देण्यात आलेली आहेत. तथापि याबाबत राज्यमंत्री, ग्राम विकास यांनी असे सूचित केले की, ज्या योजना 5 ते 10 वर्षे आणि त्यापेक्षा जास्त काळ रेंगाळलेल्या आहेत अशा योजनांचे बाबतीत योजनांवार सविस्तर माहिती सादर करावी. (तक्ता मंडळास अवलोकनार्थ सादर करण्यात यावा) राज्यमंत्री, ग्राम विकास यांनी असेही सूचित केले की,1994.95 या आर्थीक वर्षात केंद्र शासन पुरस्कृत योजनांसाठी तसेच किमान गरजा कार्यक्रमाखाली राबविण्यात येणा-या योजनांसाठी प्रत्यक्षात निधीची आवश्यकता आणि निधीची उपलब्धता याबाबतचा जिल्हावार तक्ता तयार करण्यात येऊन निधीची उपलब्धता कमी असल्यास (विशेषतः केंद्र शासन पुरस्कृत योजनांचे बाबतीत) जादा निधी उपलब्ध होण्याचे दृष्टीने आवश्यक असा प्रस्ताव ग्राम विकास विभागाकडे सादर करण्यात यावा. ही माहिती प्रथमच अतिशय चांगल्या स्वरूपात मंडळाने सादर केली आहे व त्याबद्दल मंडळाचे अधिकारी अभिनंदनास पात्र असे सचिव, ग्राम विकास हयांनी नमूद केले व अशा प्रकारचा आढावा दर तीन महिन्यांनी घेण्यात यावा. तसेच ग्रामीण योजनांचा आढावा घेण्यासाठी एक खास बैठक सप्टेंबर मध्ये आयोजित करण्यात

यावी असे सांगितले.

**कार्यक्रम बाब क्र. 24 :**

"ब" व "क" वर्ग नगरपालिकांच्या पाणी पुरवठा योजनांसाठी महा.राज्य विद्युत मंडळाकडून विज आकारणीपोटी आकारण्यात येत असलेले दर हे जास्त असल्यामुळे सदर योजनांचे देखभाल दुरूस्तीवरील खर्चासाठी खुप मोठी रक्कम खर्च करावी लागते आणि त्याचा परिणाम सदर योजनेव्दारे होणा-या पाणी पुरवठयाचे दरात होतो. सर्वसाधारणपणे "ब" व "क" वर्ग नगरपालिकांची आर्थीक स्थिती ही फारशी समाधानकारक नसल्याने त्या नगरपालिकावर या कारणाने मोठा आर्थीक बोजा पडतो. यात सुधारणा होण्याचे दृष्टीने "ब" व "क" वर्ग नगरपालिकांसाठी मिटर पध्दतीने विजेच्या बिलाची आकारणी न करता पिण्याच्या पाणी पुरवठयाचे महत्व लक्षात घेऊन **महा.राज्य विद्युत मंडळ शेतीसाठी अश्वशक्ती दरावर आधारीत जी कारणी करते त्याच्या 50% कमी दराने आकारणी करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाकडून ग्राम विकास विभागामार्फत सादर करण्यात यावा असे ठरले.**

**कार्यक्रम बाब क्र. 25 :**

राज्यातील नगरपालिकांकडून थकबाकीपोटी सुमारे 166 कोटी रूपये रक्कम येणे असल्यामुळे मंडळाची आर्थीक स्थिती अत्यंत बिकट झालेली आहे व मंडळाकडे चालू असलेल्या कामांवर खर्च करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे ब-याच वेळा बँकेकडून घेतलेल्या अधिकर्जावर (ओव्हरड्राफ्ट) अवलंबून रहाणे मंडळास भाग पडते. अशा परिस्थितीत प्रकल्प खर्चाच्या परतफेडीची एकूण रक्कम रू.11,09,41,663/- मंडळ शासनास अदा करू शकले नाही. या बाबीची मंडळाने नोंद घेतलेली असून मंडळाची आर्थीक स्थिती सुधारल्यानंतर सदर रक्कम शासनास अदा करण्याच्या प्रस्तावास मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. 26 :**

मंडळामार्फत नागरी पाणी पुरवठा योजना तसेच जलनिःसारण योजना करिता आयुर्विमा महामंडळाकडून आणि खुल्या बाजारातून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीची हमी महाराष्ट्र शासनाने दिलेली आहे. या हमी पोटी शासनास हमी शुल्क देणे मंडळास बंधनकारक आहे. परंतू सद्यस्थितीत मंडळाची आर्थीक स्थिती नगरपालिकाकडून येणा-या थकबाकीची रक्कम फार मोठया प्रमाणावर वाढल्यामुळे अतिशय बिकट झालेली असल्याने सदर हमी रक्कम रू.3,54,97,138 मंडळ शासनाला अदा करू शकले नाही. **सदर रक्कम मंडळाची आर्थीक स्थिती सुधारेपर्यंत अदा करणे मंडळास शक्य होणार नसल्याची नोंद मंडळाने घेतली असून त्यामुळे शासनाने मंडळास दंडनीय व्याजाची आकारणी करू नये अशी विनंती मंडळातर्फे करण्याचे ठरले.**

मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी खालील विषयावर चर्चा झाली.

1. भूकंपग्रस्त भागात मंडळातर्फे करण्यात आलेले काम.

वरील विषयाबाबत सचिव, ग्राम विकास यांनी असे सूचित केले की, भूकंपग्रस्त भागामध्ये युध्दपातळीवर काम करावे लागल्याने काही कामांचे बाबतीत जर मंडळाच्या क्षेत्रीय अधिका-याकडून नियमांचे पूर्णपणे पालन न करता काही कामे करण्यात आली असतील तर अशा कामांचे बाबतीत कार्योत्तर मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव ग्राम विकास विभागाकडे मंडळाने त्वरित सादर करावा. तथापि अशा

प्रकारचे कोणतेही काम मंडळामार्फत करण्यात आलेले नाही असा खुलासा मुख्य अभियंता-ग्रामीण यांनी केला.

**भूकंपग्रस्त भागात काम करून तेथील पाणी पुरवठा तातडीने चालू केला हे अत्यंत कौतुकास्पद आहे,म्हणून त्या अधिका-यांना मंडळाने प्रशस्तीपत्र द्यावे असे सुचविण्यात आले. त्यानुसार** आवश्यकती **कार्यवाही** सदस्य सचिव यांनी करावी असे ठरले. **त्याचप्रमाणे याच अधिका-यांना, शासन स्तरावरही केलेल्या कामाचे प्रशस्तीपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी सुचविले.**

2. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचा दि.24 ते 28 ऑगस्ट,94 या कालावधीत झालेल्या संपाबाबत...

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांनी दि.24 ते 28 ऑगस्ट,94 या कालावधीत संप पुकारला होता. या कालावधीत सदर महापालिकेने पाणी पुरवठा मंडळाच्या सुमारे 32 अभियंत्यांची सेवा उपलब्ध करून द्यावी अशी विनंती मंडळास केली होती. त्यानुसार मंडळाने युध्दपातळीवर संबंधित क्षेत्रीय अधिका-यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वेगवेगळया पाणीपुरवठा व जलनिःसारण केंद्रावर सदर कालावधीत काम करण्यासाठी उपलब्ध करून दिले आणि त्या कालावधीत पाणीपुरवठा व जलनिःसारण केंद्रे सुरळीतपणे चालू ठेवण्यात हातभार लावला. याबाबत मुंबई महानगरपालिकेकडून आभार मानणारे प्रशस्तीपत्र मंडळास प्राप्त झाले आहे. **सदर कामाचे गुणग्रहण करण्याचे दृष्टीने संबंधित क्षेत्रीय कर्मचा-यांना मंडळातर्फे प्रशस्तीपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित मुख्य** अभियंता यांनी सादर करावा व त्यानुसार प्रशस्तीपत्र मंडळामार्फत देण्यात यावे असे ठरले.

मंडळाची पुढील सभा दि.20 ऑक्टोबर,94 रोजी घेण्यात यावी अशा प्रकारची सूचना मा.मंत्री, नगर विकास, मा.मंत्री, ग्राम विकास तसेच राज्यमंत्री, ग्राम विकास व राज्यमंत्री, नगर विकास यांनी केली व त्यानुसार पुढील सभा घेण्याचे ठरले.

अध्यक्षांचे आभार मानून सभा समाप्त झाली.